**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dirhe.org E-Mail : dhepune@yahoo.com
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.: उशिसं/ई.बी.सी.सवलत/शिष्य./२०१६ दि. 20/10/2016

**परिपत्रक/अतितात्काळ कार्यवाहीस्तव**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय:१. शासन निर्णय क्र.:टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४ दि. १३.१०.२०१६ नूसार कार्यवाहीबाबत..**
**२. शासन पत्र क्र.: स्कॉलर-४९१६/प्र.क्र.३०७/मशि-२ दि. ऑक्टोंबर २०१६**

संदर्भ क्र. १, तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ उच्च शिक्षण विभागाशी संबंधीत असून तो पुढीलप्रमाणे आहे.- “उच्च शिक्षण विभागांतर्गत व उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित (टप्पा अनुदानावरील) महाविद्यालयांमधील ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीच्या प्रचलित योजनेतंर्गत देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षीक उत्पन्न मर्यादा ही रुपये १.०० लाख वरुन रुपये २.५० लाख इतकी करण्यात येत आहे.”

संदर्भ क्र. २ नूसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त अभ्यासक्रमांबाबत सन २०१६-१७ या वर्षी ई.बी.सी. सवलत योजना पुर्वीप्रमाणेच सुरु राहणार असून सदर योजनेच्या लाभासाठी आवश्यक असलेली विद्यार्थ्याच्या कुटुंबाची (दोन्ही पालकांचे एकत्रित उत्पन्न) वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लाख वरुन रु. २.५० लाख करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आलेल्या (१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व (२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजना उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत येणा-या अभ्यासक्रमांना लागू ठरत नाहीत.

शासन निर्णयातील तरतूदीनूसार सन २०१६-१७ मध्ये प्रवेशित व अन्य शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेणा-या रु. १.०० लाख ते रु. २.५० लाख या उत्पन्न मर्यादेतील विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर सुधारणेचा लाभ देणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त अभ्यासक्रमांमध्ये उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर योजनेचा लाभ देण्यासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे-

| अ.क्र. | अंमलबजावणीचे स्वरुप | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण, संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना | २०.१०.२०१६ |
| ०२. | विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारणे | २४.१०.२०१६ व १५.११.२०१६ |

| | | |
|---|---|---|
| ०३. | उच्च शिक्षण संचालनालयामार्फत हिवाळी अधिवेशन, २०१६ पुरवणी मागणी प्रस्ताव शासनास सादर करणे | २८.११.२०१६ |
| ०४. | महाविद्यालयस्तरावर प्राचार्यामार्फत अर्जाची छाननी व डुप्लीकेशन अर्जाची छाननी व तपासणी मुदत. | ३०.११.२०१६ |
| ०५. | उच्च शिक्षण विभागीय कार्यालयामार्फत व नमुनादाखल तपासणी मुदत | १०.१२.२०१६ |
| ०६. | शासनाकडून मंजूर तरतूद वितरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अधिदान व लेखा कार्यालयाकडून/जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालयाकडून देयक पारीत झाल्यानंतर विभागीय कार्यालयामार्फत तपासणी करुन संस्थांना रक्कम वितरीत करण्याचा कालावधी. | १५.१२.२०१६ |

ई.बी.सी. सवलत प्रतिपूर्ती रकमेचा प्रस्ताव सादर करताना विभागीय सहसंचालक यांनी शासकीय/शासन अनुदानित/विनाअनुदानित (टप्प्यांवरील) महाविद्यालयातील रु. १.०० ते २.५० लाख उत्पन्न मर्यादेतील ज्या विद्यार्थ्यांनी सन २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतेवेळी पुर्ण फी भरलेली आहे, अशा विद्यार्थ्यांस महाविद्यालयाकडून शिक्षण शुल्क परत केल्याची खात्री करुन तसेच प्रमाणीत करावे. सदर प्रस्ताव दि. २० नोव्हेंबर, २०१६ संचालनालयास सादर करण्यात यावेत. जेणेकरुन शासनास विहीत मुदतीमध्ये पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करणे संचालनालयास शक्य होईल.

**(डॉ. वि.रा.मोरे)**
शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.